संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ४३०/२०१७

<u>**निशाणी क्र.५**</u>

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची जबानी**
Deposition of Witness No. for the

*मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,*
I do hereby on solemn affirmation state that--

**माझे नाव : सुनिल शालीकराम कामडी**
My name Father's name
**वय सुमारे : ४३ वर्षे व्यवसाय : पो. हवा. ब.न.३९७**
Age about Years Occupation
**निवासस्थान : पोलीस ठाणे कळमेश्वर.**
Residence District

---------------

## सरतपास अभियोग पक्षातर्फे श्री. एस.एस. सावलकर सरकारी अभियोक्ता

१. दिनांक ०२/०६/२०१७ रोजी माझी नेमणूक कळमेश्वर पोलीस स्टेशन मध्ये सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावर होती. त्या दिवशी माझेकडे कळमेश्वर पोलीस स्टेशन अपराध क्र. २९३/२०१७ ची केस डायरी पुढील तपास कामी देण्यात आली. तत्पुर्वी या गुन्हयाचा तपास पीएसआय शुभांगी ढगे यांनी केला होता. पुढील तपासाकामी मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. वादग्रस्त जागेचे तक्रारी अर्ज प्राप्त केले. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने आरोपीविरुध्द आरोपपत्र न्यायालयात दाखल केले.

## उलटतपास बचाव पक्षातर्फे ॲड. सौ. ए.आर. यासतवार.

२. साक्षीदार सिमा अनिल गांगडे यांनी मला जबाब देतेवेळी असे सांगितले नव्हते की, प्रकाश हा मुर्ती पाडुन घरी पळाला होता. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांचे बयाण मी त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द खोटे आरोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणने खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

३. उलटतपास संपला.

४. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरीत/—

**(दे.द. सुर्यवंशी)**

दिनांक : १७.११.२०१८. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळमेश्वर.